# धनगर समाजातील स्त्रियांचे बदलते स्थान व उपजीविका

संशोधक
**कु. आभा आसाराम सिंगनजुडे**
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ,
नागपूर

मार्गदर्शक
**डॉ. सुरेंद्र धनसिंग पवार**
एम.ए. (समाजशास्त्र), एम.एड., एम.फिल., पीएच.डी.,
एच.डी.सी.एम., जी.डी.सी.ए.
प्राचार्य, एन. जे. पटेल महाविद्यालय, मोहाडी, जि. भंडारा

**सारांश :**
हा अभ्यास धनगर समाजातील स्त्रियांचे बदलते स्थान व उपजीविका यांचा शोध घेतो. धनगर महिला पारंपारिकपणे पशुपालनात सक्रिय असल्या तरी आता त्या शिक्षण स्वयंसहायता गट आणि सरकारी योजनांच्या मदतीने सेंद्रिय शेती, फुल शेती आणि इतर उद्योगांमध्ये स्वतःला सक्षम करीत आहेत, त्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळत आहे. या शोधनिबंधाचा उद्देश धनगर समाजातील स्त्रियांची खरी ओळख समजून घेणे हा आहे. तसेच यात स्त्रियांच्या बदलत्या स्थितीचा (स्थान व उपजीविका) शोध घेण्यात आला आहे. या संशोधनात प्राथमिक व दुय्यम डेटा विश्लेषणासाठी वापरला गेला आहे. प्रश्नावली तयार करून प्रत्यक्षरीत्या मुलाखत घेऊन स्त्रियांचे बदलते स्थान व उपजीविका यांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच धनगर समाजातील पन्नास (५०) स्त्री प्रतिसादकर्त्यांचा नमुना काढला आहे. या अभ्यासावरून धनगर समाजातील स्त्रियांच्या स्थान व उपजीविकेत बदल झालेला दिसून येत आहे.
**बीजशब्द :** धनगर, समाज, स्त्रियांचे स्थान, बदलते स्थान, उपजीविका.

**विषयाचा परिचय :**

भारतीय समाज हा जगातील एक प्राचीनतम समाज आहे. सा-या जगाने नवल करायचे असे हा अद्‌भुत रम्य भारतीय समाज आहे. त्यात विविध प्रकारची विषमता व वैचित्र्य आहे. विविधता हे भारतीय समाजाचे खास वैशिष्ट्य आहे. सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी जेव्हा संपूर्ण जग अज्ञान व पशुत्व यांच्या अधागत पूर्णपणे बुडलेले होते. त्यावेळी भारतीय समाजमात्र विकासाच्या अत्युच्य शिखरावर आरूढ झाला होता. ह्याचे मुख्य कारण म्हणजे भारताची अद्‌भुतरम्य व तत्वाधिष्टीत अशी समाज रचना होय. भारतीय समाज प्राचीन असला तरीही त्यात काळानुसार बदल झालेला दिसून येतात व ते लेखीही अपरिहार्य आहे. म्हणूनच भारतीय समाज हा उत्क्रांतीशील आहे, म्हणता येते. मनुष्य आपले दैनंदिन जीवन समाजात राहूनच जगतो. माणूस आणि समाज यांना एकमेकांपासून वेगळे करणे अशक्य आहे. कारण समाजातच माणसांची जडण-घडण होते. मानवी मत हे असंख्य इच्छांचे उगमस्थान असून मानवी गरजाही अमर्यादित आहेत.

जीवन जगण्यासाठी असलेले अन्न, वस्त्र व निवारा या गरजा स्थळ, काळ आणि व्यक्तीपरत्वे बदलत जातात आणि यातूनच मानवाचा विकास व सामाजिक परिवर्तन होत जाते. सामाजिक परिवर्तनाचा संबंध सामाजिक व्यवस्थेशी असतो आणि सामाजिक व्यवस्थेशी असतो आणि सामाजिक व्यवस्था ही समाजातील माणसांच्या वेळ, श्रम, पैसा, संस्कृती, राहणीमान, आचार-विचार, व्यवसाय एकमेकांशी असलेले संबंध इत्यादीवर अवलंबून असते. अनेक वंश, भाषा, धर्म, जाती, पंथ यासारख्या विविध घटकांनी मिळून समाज बनलेला आहे.

बदल म्हणजे परिवर्तन. परिवर्तन हे सतत सुरू असणारी प्रक्रिया आहे. आदिवासी भटक्या जमाती, ग्रामीण, नगरी अशा सर्व समुदायांमध्ये, समाजांमध्ये सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया भूतकाळात सुरू होती. वर्तमान काळातही ती सुरू आहे, भविष्यातही येथे सुरू राहील. हे सामाजिक वास्तव मान्य केले तरीही कोणत्याही समाजातील प्रथा, परंपरा, नियम, कायदे, मूल्ये आणि सामाजिक संबंधाची आकृतीबंध हे सर्व पूर्णतः कधीच बदलत नाहीत. तसेच परिवर्तनामुळे पूर्णतः नवीन अशी नियम, मुल्ये, सामाजिक संबंधाचे आकृतीबंध निर्माण होत नाही. म्हणूनच स्थितीशी आणि गतिशील अशी समाजाची दोन रूपे आहेत. बदल घडून येण्यासाठी जबाबदार असणा-या घटकांमध्ये तंत्रविज्ञानात्मक घटक हा एक प्रमुख घटक आहे. मानव हा जिज्ञासू आहे. मानवाच्या जिज्ञासू वृत्तीमुळे नवीन शोध लागतात. धनगर समाज विकासाच्या प्रारंभिक अवस्थेत मेंढ्या, गुरे पाळणे हेच काम करत होता. परंतु बदलत्या जीवन पद्धतीमुळे मानवाच्या सामाजिक जीवनात अनेक प्रकारचे बदल घडून आलेत. आजचे युगे विज्ञानाचे तसेच औद्योगिक युग आहे. प्रगत तंत्रज्ञान हे सामाजिक परिवर्तन घडवून येण्यासाठी जबाबदार घटक आहे, असे म्हणता येते.

स्त्रियांचे मानवाधिकार आणि सामाजिक स्थिती ही अठराव्या शतकापर्यंत दुर्लक्षित बाब होती व कुणीही स्त्रियांचा कुटुंबाच्या बाहेर वेगळे किंवा स्वतंत्र अस्तित्वाचा विचारच करीत नव्हते. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या शोषणावर पहिल्यांदाच सामाजिक, राजकीय, आर्थिक अंगातून चिंतन होऊ लागले व त्यातूनच वेगव्या ज्ञानशाखांची निर्मिती झाली. आजच्या घटकेस स्त्रियांची गरज व स्थिती वेगळ्याने लक्षात घेऊन अनेक ज्ञानशाखा नुसत्या कार्यरतच नाहीत तर स्त्रियांच्या सशक्तीकरणाच्या संदर्भात अनेक योजनांमध्ये त्या प्रत्यक्ष कार्यरत आहेत. स्त्रियांचा संपत्तीत वाटा, श्रम, विभाजनात व्यथा वाटेला आपले कार्य आणि त्यांचे सामाजिक मूल्य, कुटुंब या मूलभूत संस्थेत स्त्रियांची स्थिती व त्या अनुषंगाने त्यांच्या वाटेला आलेली सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा या पुरुषांच्या तुलनेत दुय्यमतेचे हे असे चक्रव्यू आहे की ज्यातून स्त्रीची मुक्ती नाही.

भारतीय स्त्रीच्या जीवनाचा इतिहास बराच खडतर उतार-चढाव असलेला आढळतो. वेदकाळात स्त्रीला बरेच स्वातंत्र्य असल्याचे दिसून येते. त्यानंतरच्या काळात तिच्या स्वातंत्र्यास मर्यादा पडत गेल्या आणि एकोणिसाव्या शतकापर्यंत

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

ती बरीच बंदिस्त झाली. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तिला अनेक क्षेत्रात स्वातंत्र्य मिळाले. एवढेच नव्हे तर स्त्रीने स्वतः देखील आपल्या विकासाकरिता सक्रिय प्रयत्न केला आणि पुरुषांच्या तुलनेत कुठल्याही बाबतीत ती कमी नाही याची पावती ती आपल्या कर्तृत्वाने देऊ लागली आहे आणि म्हणूनच स्त्रीला 'शक्ती' म्हटले आहे. लक्ष्मी, सरस्वती, अन्नपूर्णा या स्त्रीदेवता आहेत, तिला 'जगतजननी' महाशक्ती म्हटले आहे.

परंतु व्यवहारात या उच्च आदर्शाची मात्र सरळ-सरळ व उघड-उघड पायमल्ली देखील होतांना आपण पाहतो आहे. केवळ शब्द सुमनांनी जीवनात सुख, शांती व स्थिरता येत नसते. आचरणाची प्रामाणिक जोड त्यासाठी हवी असते परंतु तसे होत नाही. स्त्रीला शिक्षण घेणे, घराबाहेर पडणे योग्य मानले गेले नाही, चार भिंतीच्या आतच कैद्यासारखे जीवन जगू लागली. 'पिंजरा' सोन्याचा जरी असला तरी तो शेवटी पिंजरात असतो. तरी सुद्धा आज हळूहळू चित्र बदलू लागले आहे. ही शुभदायी घटना म्हणता येईल. परंतु जोपर्यंत हे चित्र पूर्णपणे बदलत नाही तोपर्यंतच संघर्षाची प्रक्रिया चालूच ठेवावी लागणार आहे. काही शास्त्रात तर स्त्रीला चाबकाच्या धाकातच ठेवले पाहिजे, असे म्हटले आहे. स्त्री म्हणजे लोखंड नसलेली बेडी आहे. पुरुषांच्या सत् मार्गावरील सर्वात मोठा अडथळा आहे, असेही म्हटले आहे.

स्त्रिया या 'बाई' म्हणून जन्मत नाहीत, त्यांचा 'बाईपणा' समाजातून घडविला जातो, हे प्रथमच ध्यानात घेतले जाणे गरजेचे आहे. स्त्री अभ्यास म्हणजे केवळ अनुभव कथन नव्हे तर तिच्या जीवनाची घडण कशी होते. याच्या विचार सैद्धांतिक पातळीवरही व्हायला हवा, स्त्रियांकडे व्यवसायात्मकदृष्ट्या दुय्यम भूमिका का येतात? कोणत्या प्रक्रियेतून येतात? हे बघितले गेले पाहिजे. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होऊ शकणा-या स्त्रीलाही पूर्णार्थाने आर्थिक हक्क बजावता येत नाहीत. स्त्रिया सुशिक्षित असोत की नसोत त्यांना स्वयंनिर्णयाचा हक्क अजून पूर्णपणे मिळालेला नाही.

भारतीय समाज रचनेतील प्रत्येक हक्काचा इतिहास, संस्कृती आणि परंपरा ही स्वतंत्र ओळख आहे. परंतु ब्राह्मणवादी वर्णव्यवस्था लादल्यामुळे अनेक समाजाची खरी ओळख अस्पष्ट झाली आहे. अशा समाजापैकी एक म्हणजे 'धनगर समाज' धनगर हे प्रामुख्याने मेंढपाळ, गुराखी, पशुपालक म्हणून ओळखले जातात. परंतु मेंढपाळ म्हणून ओळख करून देणे हा अन्याय ठरेल. कारण हा समाज प्राचीन गणराज्य व्यवस्थेत सहभागी होता. यादव व होळकरसारख्या पराक्रमी घराण्याचा वारसा त्यांच्याशी जोडलेला आहे. संत परंपरेत त्यांचे योगदान आहे आणि आजही हे सामाजिक न्यायाच्या संघर्षात अग्रभागी आहेत.

धनगर या शब्दाची व्युत्पत्ती 'धन' म्हणजे 'पशुधन' आणि 'गर' म्हणजे 'रक्षक' अशाप्रकारे केली जाते. त्यामुळे 'धनगर' म्हणजे जनावरांचा कळप राखणारा. प्राचीन काळी पशुधन संपत्तीचे प्रतीक होते. त्यामुळे तेव्हा त्यांच्याकडे जनावरे, मेंढ्या, गाई, शेळ्या अधिक तो समृद्ध मानला जाई. धनगर समाजाचा उगम प्रागैतिहासिक पशुपालक समाजापासून झाला आहे. धनगर समाजाने आपली ताकद प्रामुख्याने पशुधनाच्या मालकीवर व लढाऊ परंपरेवर उभी केली.

धनगर मेंढपाळ असलेल्या धनगरांना महाराष्ट्र राज्यात भटक्या जमाती म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. धनगर समाजात स्त्रियांना स्थान त्यांच्या पारंपारिक भटक्या जीवनशैली आणि पशुपालन व्यवसायाशी जवळून संबंध आले. स्त्रिया कुटुंबाच्या आणि उपजीविकेच्या व्यवस्थापनात महत्त्वाची आणि सक्रिय भूमिका बजावता धनगर समाज हा महाराष्ट्रातील पारंपारिक पशुपालक समाज आहे.

ब्राह्मणवादी वर्ण व्यवस्थेला आधी समाजात कोणताही उच्च-नीच भेद नव्हता. पशुपालक, शेतकरी, कारागीर हे सर्व समानतेने जगत होते. धनगर समाजाला स्वातंत्रता होती. ते आपला धर्म, परंपरा, उपजीविका स्वातंत्र्याने पाळत होते. परंतु जेव्हा ब्राह्मणवादी वर्णव्यवस्था लादली गेली. तेव्हा धनगर समाजाला शुद्र वर्गात ढकलले गेले. त्यांच्या पारंपारिक ज्ञानाला तसेच पशुपालक, औषधोपचार, लोकपरंपरा यांना कमी लेखले गेले. त्यांना फक्त 'मेंढपाळ' या ओळखीपुरते मर्यादित केले गेले. तरी सुद्धा धनगर समाजाने आपली ओवी परंपरा व संस्कृती टिकवून ठेवली. धनगर समाज केवळ मेंढपाळ नव्हता. तर तो योद्धा व शासक देखील होता. धनगर समाजाचा हा लढाऊ वारसा महाराष्ट्राच्या इतिहासाला समृद्ध करणारा आहे.

धनगर समाजाचा उगम प्रागैतिहासिक पशुपालक समाजापासून झाला आहे. भीमबेटका येथील भिंतीचित्रात मेंढ्यांचे कळप राखणारे गुराखी दिसतात. दक्षिण महाराष्ट्रातील परावृत्तीय स्थळातून देखील मेंढ्यांचे अवशेष आढळले आहेत. त्यामुळे हे स्पष्ट होते की, सुमारे २५०० ते ३००० वर्षांपूर्वीही या समाजाचे अस्तित्व होते. ब्राह्मणवादी वर्णव्यवस्थेत धनगर समाजाचा स्वतंत्रता होती. ते आपल्या धर्म, परंपरा, उपजीविका स्वातंत्र्याने पाळत होते. परंतु जेव्हा ब्राह्मणवादी वर्णव्यवस्था लादली गेली. तेव्हा धनगर समाजाला शूद्र वर्गात ढकलले गेले. त्यांच्या पारंपारिक ज्ञानाला तसेच पशुपालन, औषधोपचार, लोक परंपरा यांनी यांना कमी लेखले गेले. धार्मिक कार्यातून त्यांना बाहेर काढण्यात आले. मंदिर प्रवेशावर बंधने घालण्यात आली त्यांना फक्त 'मेंढपाळ' या ओळखीपुरते मर्यादित ठेवले गेले होते. तरी सुद्धा धनगर समाजाने भजन, कीर्तन, लोक दैवत यांच्याद्वारे आपली संस्कृती टिकवून ठेवली. धनगर समाजाची उपासना ही लोक दैवतांवर आधारलेली आहे.

**(१) बिरोबा :**

बिरोबा म्हणजे कळपाचे रक्षण करणारे दैवत होय. महाराष्ट्रातील अनेक भागात बिरोबाची जत्रा मोठ्या थाटात भरते.

**(२) बाळूमामा :**

बाळूमामा करिश्माई लोकदैवत असून आजही लक्षावधी लोक त्यांना मानतात. त्यांच्या जत्रांमध्ये भाकरी व दुधाचा प्रसाद प्रसिद्ध आहे. धनगर समाजाच्या दैवताची ही परंपरा त्यांच्या संघटन शक्ती व सांस्कृतिक एकात्मता दर्शविते.

धनगर समाजाच्या संदर्भात स्त्रियांचा दर्जा कसा होता? व कसा आहे? या दोन स्तरावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे ठरेल. प्रत्येक समाजात स्त्रीला पुरुषाचे अर्धे अंग मानले जाते. तिला अर्धांगिनी म्हणून समाजात स्थान दिले जाते. स्त्री कुटुंबाचा पाया आहे.

आज धनगर समाजातील स्त्रिया अनेक बदलांना सामोरे जात आहेत. शिक्षण आणि आधुनिक व्यवसायाकडे त्यांच्या ओढा वाढत आहे आणि त्या विविध क्षेत्रांमध्ये आपली ओळख निर्माण करत आहेत. तरीही त्यांच्या पारंपारिक पशुपालक व्यवसायाला अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. आजच्या काळात धनगर समाजातील स्त्रिया, परंपरा, लोककला आणि कौटुंबिक जबाबदारी याचा समतोल साधने आपल्या समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे रक्षण करत आहेत. पुण्यश्लोक, अहिल्याबाई होळकर यांसारख्या धनगर समजातील स्त्रियांनी समाजाला नेतृत्व दिले.

धनगर समाजातील स्त्रियांचे पूर्वीचे स्थान हे त्यांच्या पारंपारिक पशुपालक आणि मेंढपाळ व्यवसायाशी जोडलेले होते. जिथे त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करायच्या शेळ्या-मेंढ्यांची काळजी घेणे. दूध विकणे आणि घर सांभाळून या कामांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांच्या समाजात त्यांचे स्थान हे इतर जाती-धर्माप्रमाणेच होते. जिथे त्या कुटुंबाचा आधारस्तंभ होत्या. आताही त्या समाजाच्या रुढी-परंपरा पाळत आपले जीवन जगत आहेत. धनगर समाजातील स्त्रिया पूर्वीपासूनच कणखर कुटुंब वत्सल आणि कष्टाळू आहेत. त्यांनी आपल्या पारंपारिक व्यवसायात आणि समाजात महत्त्वाची भूमिका बजावली.

**धनगर समाजातील स्त्रियांचे बदलते स्थान व उपजीविका :**

जरी स्त्रिया कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी अत्यंत महत्त्वाच्या होत्या. तरीही निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत आरोग्य, शिक्षण यासारख्या बाबींमध्ये त्यांना दुय्यम स्थान होते आणि अनेकदा घरातील पुरुषांचे निर्णय अंतिम मानले जात. शिक्षणामध्येही मुलींना पूर्वी फारसे महत्त्व दिले जात नसे, असे दिसून येते.

परंतु अलीकडे स्वयंसहायता गट स्थापन करून सेंद्रिय शेती, कुक्कुटपालन आणि विविध सरकारी योजनांचा लाभ घेऊन स्वतःच्या व्यवसायातून आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. धनगर समाजातील स्त्रियांच्या उपजीविकेचे मुख्य स्त्रोत त्यांच्या पारंपारिक जीवनशैली आणि कौशल्याशी संबंधित आहेत. त्यांच्या उपजीविकेला पुरुषांच्या कामाला पूरक भूमिका असते. तसेच काही स्वतंत्र आर्थिक क्रियाकलाप देखील असतात. स्त्रिया घरकाम मुलांची काळजी घेणे तसेच मेंढ्या, गाई, शेळ्या यांची देखभाल करणे ही कामे करतात. अनेक धनगर स्त्रिया लोकर कातण्याचे काम करतात आणि नंतर ते बाजारात किंवा स्थानिक विणकारांना विकतात. तसेच मेंढ्या आणि शेळ्यांच्या दुधापासून आणि मासांच्या उत्पादनातून मिळणारे उत्पन्न कुटुंबाच्या उपजीविकासाठी महत्त्वाचे आहे. अनेक कुटुंबे, शेती आणि पशुपालन यावर अवलंबून असल्याने स्त्रिया शेतीच्या कामातही मदत करतात. तर काही स्त्रिया शेतमजुर म्हणून रोजंदारीवर काम करतात.

आधुनिक काळात पारंपारिक उपजीविकेवर वाढत्या आधुनिकतेमुळे आणि हवामान बदलामुळे अनेक धनगर कुटुंबे पर्यायी उपजीविकेचे मार्ग शोधत आहेत. यामध्ये बिगर शेती कामे मजुरी आणि लहान-मोठे व्यवसाय यांचा समावेश केला आहे.

बंदिस्त शेळी, मेंढी पालन प्रकल्पांसाठी महिला सरकारी संस्थांच्या ६५ टक्के अनुदान मिळत असल्यामुळे त्यांना व्यवसाय सुरू करण्यास मदत होते.

शिक्षण आणि रोजगाराच्या संधीद्वारे स्त्रिया आता नोकरी आणि व्यवसायातही पुढे येत आहेत, त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारत आहे.

काही स्त्रिया कृषी सखी म्हणून प्रशिक्षण घेऊन शेतीमध्ये उत्तम शेती करण्याचे मार्गदर्शन करीत आहेत.

हळूहळू समाजात राहून शिक्षणाने मने सुसंस्कारित बनतात, विशाल बनतात. शिक्षण सत्य-असत्याची ब-या-वाईटाचा असा निवारण करणारी शक्ती देते. शिक्षणाने विझलेली मने पेटतात. शिक्षणाने पराभवाची आणि विजयाची कारणे कळतात. शिक्षणाने जसे काय करावे हे कळते तसेच काय करू नये हेही कळते. युगाची चाहूल कळते या अर्थाने शिक्षण हे सम्यक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम होय. हे धनगर समाजातील स्त्रियांना कळू लागले आणि त्या शिक्षण घेण्यास सरसावल्या व समुचित दिशेने होणारे सर्वांगीण बदल स्वीकारण्यास तयार झाल्या.

पशुपालन करीत असतांना चा-यासाठी ते एका ठिकाणावरून दुस-या ठिकाणी भटकतात, परंतु अन्न संकलन अवस्थेच्या तुलनेत ही अवस्था प्रगत होती. गायी, म्हशी, मेंढ्या तसेच अन्य प्राण्यांचे कळप या लोकांजवळ असत. या प्राण्यांचे केस, कातडी, दूध, मांस हे त्यांच्या उत्पादनाचे प्रमुख स्त्रोत होते. पशुपालक लोक साधारणतः डोंगराळ प्रदेश अथवा जिथे गवताळ प्रदेश आहे तिथे आढळून येत होते.

समाजशास्त्रज्ञांनी प्रक्रिया, प्रगती, उत्क्रांती, विकास, समायोजन, अधोगती, सामाजिक सुधारणा, सामाजिक पुनर्रचना, सामाजिक चळवळ, संस्कृतीकरण व पश्चिमात्यीकरण, आधुनिकीकरण या सामाजिक परिवर्तनाच्या संकल्पनेद्वारे सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा प्रकारे एकंदरीत धनगर समाजाच्या अर्थव्यवस्थेत आणि जीवनशैलीत स्त्रियांचा मोठा वाटा आहे, असे दिसते. जो मुख्यतः पशुपालन आणि संबंधित कामांवर केंद्रित आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात प्रस्थापित ज्ञानात भर टाकून अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे जुन्या ज्ञानाचे परीक्षण करून नवीन ज्ञानाची मांडणी करणे, हा संशोधकाच्या हेतू आहे. या संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोत विश्लेषणासाठी वापरला गेला आहे. संशोधन अहवाल, शोधनिबंध, जर्नल्स आणि पुस्तकांमधून दुय्यम डेटा गोळा केला.

क्षेत्रीय सर्वेक्षणादरम्यान मुलाखत आणि निरीक्षणाद्वारे प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली आहे. यात पन्नास (५०) प्रतिसादकर्त्या स्त्रियांचा नमुना काढण्यात आला. त्यानुसार धनगर समाजातील स्त्रियांच्या मुलाखती घेण्यात आल्या. आंतर विचारांदरम्यान संरचित प्रश्नावलीच्या आधारे उत्तरदात्यांना काही प्रश्न विचारण्यात आले. त्यात असे दिसून आले की, शेती करणा-या स्त्रियांची संख्या १५ असून त्यांची टक्केवारी ३० टक्के आहे. घरकाम करणा-या स्त्रियांची संख्या १० असून टक्केवारी २० टक्के आहे. संशोधनातील स्वयंरोजगार करणा-या स्त्रियांची संख्या २० असून टक्केवारी ४० टक्के आहे. मात्र नोकरी करणा-या स्त्रियांचे प्रमाण अल्प असून ते उत्तरदाते ०५ असून टक्केवारी १० टक्के आहे. यावरून असे निदर्शनास येते की, सर्वात जास्त उत्पन्न प्राप्त करणा-या स्त्रिया स्वयंरोजगारातून आहेत. तर अत्यंत कमी प्रमाण हे नोकरी करणा-या स्त्रियांचे दिसून येते. अशा प्रकारे मुलाखतींमधून गोळा केलेल्या डेटाच्या आधारे या शोधनिबंधातून धनगर समाजातील स्त्रियांचे बदलते स्थान व उपजीविका यांचे परीक्षण केले आहे.

**चर्चा :**

प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश असा आहे की, धनगर समाजातील स्त्रियांची खरी ओळख समजून घेणे त्यांच्या स्थितीबद्दल व उपजीविकेबद्दल वस्तूनिष्ठ चर्चा करणे, धनगर समाजातील स्त्रिया शिकून अर्थार्जन करीत असल्या तरी त्या कुटुंबाच्या जबाबदारीतून सुटलेल्या नाहीत. इतर समाजातील स्त्रियांच्या तुलनेत धनगर समाजातील स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपल्या कौशल्याने, बुद्धीने, कर्माने, चिकाटीने, शिक्षणाने, श्रमाने, अनुशासनाने, सहनशीलतेने सतत पुढे-पुढे मार्गक्रमण करीत आहेत, असे असले तरीही त्यांच्या समस्या अजूनही संपलेल्या नाहीत. स्त्रियांना घरात व घराबाहेरील दोन्ही ठिकाणी काम करावे लागते. त्यामुळे तिच्या कष्टात दुहेरी भर पडली आहे. परंपरागत दृष्टिकोनात म्हणावा तसा बदल झालेला नाही. घरातील सर्व कामे आटोपून कामावर वेळेवर उपस्थित राहण्यासाठी तिच्या जीवनाची धावपळ तिला अनारोग्याकडे घेऊन जाते. आपल्या उपजीविकेचा प्रश्न सोडविण्यासाठी बाहेर निघाले की ती आपल्या मुलांकडे लक्ष देऊ शकत नाही. त्यांच्यासोबत पूर्ण वेळ घालविण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो. याची खंत कामकरी स्त्रीला नेहमीच असते. मुले बिघडण्याची भीती अशा स्त्रियांच्या मनात सतत असते. त्यामुळे त्या नेहमी अस्वस्थ असतात. आजही काम करून स्वतंत्रपणे कमविणा-या स्त्रियांना स्वतंत्रपणे खर्चाचा अधिकार मात्र तिला नाही. धनगर समाजातील स्त्री आज घराबाहेर जाऊन कमावू लागली आहे, तरी ती पूर्णपणे स्वतंत्र नाही. स्त्री ही उपजीविकेची समस्या दूर करण्यासाठी हातभार लावत असल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात स्त्रियांच्या घरकामाचा वाटा महत्त्वाचा मानला गेला पाहिजे, त्यामुळे तिचे स्थान उंचावेल. याचा अर्थ अजूनही स्त्री म्हणून तिच्या जीवनाला नियमाच्या बंधनाच्या शृंखला आहेतच. अजूनही तिला बरीच मजल गाठायची आहे हे मात्र सत्य आहे.

नोकरी करणा-या स्त्रियांना दुहेरी भूमिका वठवावी लागते. यातून शारीरिक व मानसिक ताण पडतो. आरोग्यावर त्याचा वाईट परिणाम होतो. कधी-कधी भूमिका संघर्ष देखील निर्माण होतो. बाहेर नोकरी, मजुरी, व्यवसाय केल्यानंतर घरी स्त्री म्हणून तिची पारंपारिक भूमिका मात्र बदलली नाही. काही बाबतीत तिला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळाले आहे. परंतु सर्वच बाबतीत अजूनही समान दर्जा मिळालेला दिसत नाही.

पारंपारिक संस्काराचा पगडा आजही शिक्षित स्त्रीवरही दिसून येतो. नोकरीपेक्षाही जास्त स्त्रियांना कार्यस्थळ आणि कुटुंब यात स्वतःला समायोजित करावे लागते. वेळेचे बंधनही स्त्रीला पाळावे लागते. अधिक स्वातंत्र्य व मोकळेपणा तिच्या संसारात तणाव निर्माण करू शकतो, याची भीतीही स्त्रीला नेहमीच असते. स्त्रीच्या मनाचा ठाव भल्याभल्यांना घेता येत नाही. धनगर समाजात पुरुषांच्या तुलनेत स्त्रीच जास्त काबाडकष्ट करतांना दिसून येते. तरी तिला कुठलेच आर्थिक स्वातंत्र नसून स्त्री ही सर्वच बाजूंनी (धार्मिक, सामाजिक, आर्थिक, मानसिक) रूढी, परंपरा, प्रथा यात तुलनेने अधिक बंदिस्त असल्याचे दिसते. स्त्री शिक्षणाची आवश्यकता वादातीतपणे सिद्ध झालेली आहे. स्त्रियांच्या शिक्षणाकडे केवळ एक सामाजिक गरज म्हणून पाहणे संकुचित होईल. ती आर्थिक विकासाची गरज आहे तसेच ती राष्ट्रबांधणीची गरज देखील आहे. समान अर्धी लोकसंख्या म्हणजे स्त्रिया अशिक्षित राहिल्या, अडाणी राहिल्या तर आपल्या समाजाचा उत्कर्ष होईल काय? समाजातील अर्ध्या मानवसामुग्रीचा उपयोग न करणे म्हणजे साधन सामुग्रीचा अपव्य होय. यावरून स्त्री शिक्षणाची आर्थिक गरज वादातीतपणे स्पष्ट होते. समाजातील काही कुटुंबात 'चुल आणि मूल' या दोन गोष्टीपुरतीच स्त्रियांची भूमिका मर्यादित असलेली दिसून येते. या दोन गोष्टींपलीकडचे आणि स्वतःचे असे वेगळे जग या स्त्रियांना नाही असे चित्र स्त्रियांच्या स्थान व भूमिकेबाबतच्या पारंपारिक दृष्टिकोनातून दिसून येते. हा दृष्टिकोनच स्त्री शिक्षणाच्या प्रसार व प्रचारातील एक प्रमुख अडसर आहे. या दृष्टिकोनचा त्याग करून स्त्रियांच्या स्थान व भूमिकेबाबतचा आधुनिक दृष्टिकोन मान्य केल्याशिवाय स्त्री शिक्षणाचा मार्गच मोकळा होऊ शकत नाही. स्त्रीला एक व्यक्ती म्हणून पुरुषाने इतकेच आपली भूमिका वठविण्याचे स्वातंत्र्य असावे, त्यांना पुरुषांएवढाच समान हक्क प्राप्त व्हावा. स्त्रिया बदलल्या तर पुरुष आणि समाजामध्ये बदल आपोआपच घडून येईल. म्हणून परिवर्तनाची मूलभूत आवश्यकता स्त्री शिक्षणच आहे. स्त्री शिक्षणाला दुय्यम लेखन परिवर्तन शक्य नाही. स्त्रियांना पुरुषांइतकेच व पुरुषांप्रमाणे शिक्षण दिल्या गेले पाहिजे, याबाबत कोणताही वाद असू नये. स्त्री शिक्षणाबाबत जोपर्यंत कोणत्या-ना-कोणत्या स्वरूपाची कृत्रिम विभाजन केले जाईल, तोपर्यंत स्त्री-पुरुष समता प्रस्थापित होणारच नाही.

स्त्री-पुरुष समता प्रस्थापित होण्याचा पहिला आणि सर्वात मुलभूत भाग म्हणजे स्त्रियांना स्वतःच्या हिताचा-अहिताचा विचार करण्याचा हक्क दिला गेला पाहिजे. जोपर्यंत या समाजातील स्त्रियांना आपण आपले प्रश्न स्वतःच सोडविले पाहिजे असे वाटणार नाही तोपर्यंत स्त्री शिक्षणाचा उद्देश्य केवळ साक्षरता निर्माण करण्याइतपतच मर्यादित राहील आणि हे सामाजिक, आर्थिक परिवर्तनासाठी फारसा फरक ठरणार नाही. स्त्री शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादित करताना ती समाजाची मुलभूत आवश्यकता होय. स्त्रियांची अवस्था जोपर्यंत सुधारणार नाही, तोपर्यंत त्या कुटुंबाची व त्या समाजाची

अवस्था सुधारणे शक्य नाही. जर या समाजातील स्त्रियांना योग्य तो सन्मान, आदर व शैक्षणिक विकासाची संधी मिळाली नाही तर त्याचा केवळ स्त्री समाजातील स्त्रियांच्या जीवनावरच नव्हे तर देशाच्या विकासावरही विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. कारण कुटुंबाच्या भल्यासाठी आणि विकासासाठी स्त्रीने शिक्षण घ्यावे असा स्त्री शिक्षणाचा सीमित अर्थ नाही. तर स्त्रीने स्वतःच्या आणि समाजाच्या विकासासाठी शिक्षण घ्यावे असा स्त्री शिक्षणाचा अर्थ आहे. हे शिक्षण तिला स्वतंत्र करणारे आणि आर्थिक बाबतीत स्वातंत्र्य देणारे असले पाहिजे. कारण आजच्या काळाची ती अत्यंत महत्त्वाची गरज आहे. समाज विकासाच्या प्रत्येक अवस्थेत शिक्षण प्रक्रियेचे अस्तित्व असल्याचे दिसून येते. तसेच ज्ञान, कर्तृत्व, महत्वकांक्षा यांनी निर्माण केलेल्या तुरुंगाच्या पलीकडे, स्त्रीला जाता आले पाहिजे. महत्त्वकांक्षेची पूर्तता आपल्या शक्तिवर आणि आपल्या मानसिक बळावर अवलंबून असते. स्त्रीने जीवनात प्रथम आपले ध्येय निश्चित करावे आणि मग त्याच्या मागे धावावे. कशाचीही फिकीर न बाळगता लोकनिंदेकडेही दुर्लक्ष करून कारण लोक काय म्हणतील याची फिकीर केली की आपली निष्ठा ढळू लागते. आपण होऊन आव्हानांचा सामना करण्यात जी लज्जत आहे, ती सुरक्षित अलिप्तपणात नाही. एक सुरक्षित स्त्री शंभर लोकांसमान असते. धनगर समाजातील स्त्रियांच्या बाबतीत वादळाशी धैर्याने झुंजण्यात पुरुषार्थ आहे, जिवंतपणा आहे. जगण्याचा, उमलण्याचा, गतिमानतेचा आनंद आहे, असे दिसून येते.

**निष्कर्ष :**

- ❖ महाराष्ट्रातील धनगर समाजाचा अभ्यास गेल्या एक-दोन दशकांपासून महाराष्ट्रातील एकूण धनगर समाजाच्या विविध चळवळी लक्षणीयरित्या वाढून राजकीय जाणिवांच्या माध्यमातून सजगतेने त्यापुढे येत असल्याचे लक्षवेधी चित्र प्रथमदर्शनी दिसते आहे.
- ❖ धनगर समाजातील स्त्रियांचा इतिहास केवळ मेंढपाळ म्हणून न मोजता गणराज्यातील नागरिक, योद्धे, शासक, संत आणि समाज सुधारक म्हणून पाहिले पाहिजे.
- ❖ व्यवस्थेत त्यांना खालच्या पातळीवर ढकलण्यात आले तरीही त्यांनी आपली ओळख टिकवून ठेवली.
- ❖ स्त्रियांच्या शैक्षणिक क्षेत्रात हळूहळू प्रगती होत आहे. तरीही ग्रामीण भागात मागासलेपणा आहे.
- ❖ स्त्रियांचा अजूनही मोठा हिस्सा पारंपारिक मेंढपाळ व्यवसायावर अवलंबून आहे, पण अनेकांनी शिक्षण व नोकरीमुळे आधुनिक क्षेत्रात पाऊल टाकले आहे.
- ❖ आधुनिक काळात धनगर समाजातील स्त्रियांनी शिक्षण, समाजकारण व राजकारणात पाऊल टाकलेले आहे. तसेच शिक्षण प्रसारसाठी अनेक संस्थांची स्थापना केली आहे.
- ❖ अनेक स्त्रियांनी सामाजिक सुधार चळवळींमध्ये सहभाग घेतलेला आहे.
- ❖ धनगर समाजातील स्त्रियांनी राजकीय क्षेत्रात आमदार, खासदार असे प्रतिनिधित्व करून समाजाचा आवाज बुलंद केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

(१) डॉ. तोष्णीवाल एस. आर. (२००९) "भारतीय समाज समस्या आणि प्रश्न", प्रकाशन नागपूर
(२) प्रा. लोटे रा. ज. (२०१५) "भारतीय समाज आव्हाने आणि समस्या", प्रकाशन नागपूर
(३) प्रा. घाटोळे रा. ना. (२०१६) "समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
(४) वसंत पाटील (१९९७) "सप्तरंगी प्रेरणा", प्रकाशन पुणे (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ, पुणे)
(५) डॉ. क-हाडे बी. एम. (२०२३) "बंजारा बदलते समाजजीवन आणि संस्कृती", प्रकाशन नागपूर
(६) रॅशनल मराठी यूट्यूब चॅनल (शोधनिबंध)
(७) धनगर समाज जागृती चॅनल
(८) डॉ. आगलावे प्रदीप (२०१४) "सामाजिक संशोधन : पद्धतीशास्त्र व तंत्रे", प्रकाशन नागपूर
(९) डॉ. सौ. कोलारकर शकुंतला (२००६) "माझ्या अस्तित्वाचा लढा", प्रकाशक नागपूर
(१०) डॉ. चिमोरे सुनील प्रकाश, "भटक्या जमातींचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास", अध्ययन
(११) भुजाडे होमेश (२००८) 'धनगर समाज दशा आणि दिशा', प्रकाशन विलास पुनसे, वर्धा
(१२) इंटरनॅशनल जर्नल फोर मल्टीडिसिप्लीनरी रिसर्च वॅलूम, ६ एप्रिल २०२४
(१३) डॉ. बिडगर अशोक धोंडीबा लिखित, 'महाराष्ट्रातील धनगर समाजाचा अभ्यास', शोधनिबंध